संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# मुलांचे गर्दीत हरवणे आणि हरवणाऱ्यांची गर्दी

एखादी सामाजिक समस्या किती नाजूक, भावनिक आणि गंभीर असू शकते, याची काही उदाहरणे आपल्या देशात विशेषत्वाने पहायला मिळतात. अशांपैकीच एक समस्या म्हणजे लहान मुले हरवण्याचा प्रकार. आईवडिलांचा हात गर्दीमध्ये सुटल्यामुळे मुले हरवणे हा एक भाग झाला. परंतु आपले राहते घर आपले आईवडील, भाऊबहीण, मित्र परिवार, नातेवाईक आपली गल्ली, आपला मोहल्ला आपले गाव सोडून पळून जाणाऱ्या मुलांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे. अशा हरवलेल्या किंवा घर सोडून जाणाऱ्या मुलांना असे कोणते कारण सापडते की, त्यांना हा उपाय अधिक जवळचा वाटतो. अशा हरवलेल्या आणि घर सोडून जाणाऱ्या सगळ्यांच्याच कहाण्या सारख्या नसतात; परंतु कारुण्यपूर्ण नक्कीच असतात. एकतर इतक्या लहान वयात त्यांच्या मनामध्ये आपल्या कुटुंबाचे, नातेवाईकांचे सगळे पाश सोडून पळून जाण्याचा धाडसी विचार कसा काय येतो त्याचे आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. घरातून निघून गेलेला मुलगा किंवा मुलगी जिला आपण हरवलेली घोषित करतो. परंतु खरे पाहता अशा हरवलेल्या मुलांपेक्षाही अलीकडे पळून जाणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे त्यातही अनेक मुलामुलींना पळवून नेण्याचेही कारस्थान नियोजनपूर्वक घडवून आणले जाते. म्हणूनच हरवलेल्या मुलांपेक्षाही पळून गेलेल्या किंवा पळवून आणलेल्या मुलामुलींची समस्या अधिक गंभीर होत आहे. मुंबईसारख्या महानगरात रोज चार-पाच अशा घटना घडतात. गेल्या तीन वर्षांत २०६० मुले हरवल्याची पोलीस दप्तरी नोंद झाली. त्यापैकी सातशे मुले अजूनही सापडलेली नाहीत. यामध्ये मुलींचे प्रमाणही मोठे आहे. हरवलेल्या किंवा पळून जाणाऱ्यांना शोधून काढणे हे एका पोलिसापुढे सर्वात मोठे आव्हानच असते; परंतु यातला धक्कादायक भाग असा आहे की, हरवलेली मुले किंवा पळून गेलेली मुले ही १ ते १५ या वयोगटातली आहेत. पोलिसांकडे तक्रार आल्यानंतर अशांचा शोध सुरू होतो. यातल्या बऱ्याच मुलामुलींचा शोध लागतो. मात्र शोध न लागलेल्यांची संख्याही थोडीथोडकी नाही एकतर मग ही मुले कुठेतरी रेल्वे स्टेशनवर किंवा झोपडपट्ट्यांमध्ये अंगावर येईल ती कामे करतात. त्यांच्या या निरागस बालपणाचा, निरक्षरतेचा आणि हतबलतेचा गैरफायदा घेतला जातो. ही सातशे मुले सापडलेली नाहीत ही संख्या निश्चितच विचार करायला लावणारी आहे. मुंबई हे गर्दीचे माहेरघर असेल. परंतु इथे मुले आणि मुली हरवणाऱ्यांचीसुद्धा मोठीच गर्दी होताना दिसते.

## मुलींचेही मोठे प्रमाण

मोठी माणसे किंवा लहान मुले-मुली हरवण्याची कारणे जर शोधायची म्हटली तर त्यामध्ये दोन तीन गोष्टी सामायिकपणे आढळून येतात. त्यामध्ये गरिबी आणि कुटुंबातले कलह भांडणे ही प्रमुख कारणे असतात. घरी आई-बाप आपले पोट भरू शकत नाही. आपल्याला शिक्षण देऊ शकत नाहीत. आपण आपल्या आईबापांचा भार बनून राहण्यापेक्षा किंवा त्यांच्या हातचा रोज मार खाण्यापेक्षा घराच्या बाहेर पडून काट्यावर आयुष्य भिरकावून देणारी ही मुले बघितल्यानंतर आपल्या सामाजिक परिस्थितीतल्या खाचखळग्यांची कल्पना येते. जे व्हायचे ते होईल निदान आपल्यासमोर स्वत:ची आणि लहान भावंडांची आबाळ होणार नाही, असा काहीतरी विचित्र विचार करून हजारो मुले घरदार सोडून शहरांकडे धाव घेतात. पोलिसांकडे तक्रार केल्यामुळे थोडीफार आकडेवारी समोर तरी येते. परंतु तक्रार न केलेल्या आणि घरापासून बेपत्ता झालेल्या मुलांची संख्या यापेक्षाही जास्त असू शकते. आई-वडील निरक्षर असतात ते पोलिसांपर्यंत पोहचू शकत नाही. काही मुलांना तर आई-वडीलही नसतात. नातेवाईकांकडे राहणारी मुले केव्हातरी घर सोडून पळ काढतात. प्रामुख्याने उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, मध्य प्रदेश, ओरिसा या राज्यातून घर सोडून पळून जाणाऱ्यांची संख्या सर्वाधिक असते. ही आकडेवारी केवळ प्रमाण दाखवणारी नाही तरआपली सामाजिक परिस्थिती किती दिवसेंदिवस वेगाने घसरत आहे याचे ते निदर्शक ठरते. घरातल्या खाजगी कारणांमुळे ही मुले बाहेर पडतातही; परंतु त्यांना शोधण्याची कार्यक्षम यंत्रणा अजूनही आपल्याकडे निर्माण झालेली नाही. पोलीस विभागात हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे ही गोष्ट खरी; परंतु यासाठी लागणारे गांभीर्य आधुनिक तंत्रज्ञान आणि एक सामाजिक जाणीव या गोष्टींची तीव्र उणीव आहे. पळून गेलेल्या मुलांचे अतोनात हाल होतात. आजही मुंबईच्या अनेक रेल्वे स्थानकांवर आठ ते पंधरा वयोगटातील उघडीनागडी पोरं एकतर कचरा गोळा करताना आढळतात किंवा त्यांना भीक मागायला भाग पाडले जाते. अनेकांचा तर मादक पदार्थांच्या तस्करीसाठी उपयोग करून घेतला जातो. अलीकडेच बाहेर आलेल्या माहितीप्रमाणे याबद्दल मुलामुलींचे अवयव काढून विकण्याचे प्रकार घडतात. मुलींना जबरदस्तीने वेश्यावस्तीत ढकलले जाते. एवढेच नव्हे तर पैशाच्या मोबदल्यात त्यांना परदेशात रवाना केले जाते. म्हणूनच या हरवलेल्या किंवा पळून गेलेल्या मुलांच्या समस्येला एक वेगळेच व्यापक कारण असल्याचे दिसून येते.ज्याचा देशाच्या राष्ट्रीयतेशी आणि सामाजिकतेशी थेट संबंध येतो.

## चांगल्या कुटुंबातली वाईट कारणे

अनेक ठिकाणी चांगल्या घरातली मुले पळून जाण्याचे प्रकार घडतात. घरात मनासारखे राहायला मिळत नाही.खर्चाला पैसे मिळत नाहीत. ही सर्वसाधारण बाब म्हणता येईल. परंतु काही कुटुंबांमध्ये आई-वडिलांमध्ये असलेले मतभेद मुलांना घर सोडायला भाग पाडतात. मुलांच्या इच्छेविरुध्द विधवा आईने केलेले किंवा आई वारल्यानंतर वडिलांनी केलेले दुसरे लग्न लहान मुलांच्या मनावर फार मोठा परिणाम करतात. आपल्याच आई-वडिलांच्या या स्वार्थीपणाची मुलांमध्ये चीड निर्माण होते. गेल्याच आठवड्यात एका टीव्ही चॅनलवर दिल्लीतून घर सोडून गेलेल्या मुलाची समस्या दाखवली गेली. त्यामध्ये एका मुलाने आपले वडील आपल्या आईला सतत मारहाण करतात आणि हे आपल्याला सहन होत नसल्यामुळे आपण घर सोडून गेल्याचे त्याने सांगितले. याचा अर्थ कुटुंबाची आर्थिक दुरवस्था, निरक्षरता, व्यसनाधिनता याचाही या समस्येशी थेट संबंध पोहचतो. दरवर्षी १४ नोव्हेंबरला बालदिन साजरा होतो; परंतु आज देशाच्या प्रत्येक राज्यामध्ये बालसुधारगृहांमध्ये असलेल्या मुलांची संख्या पाहिली, तर आपण देशाची केवढी मोठी भावी पिढी बरबाद करत आहोत, याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.